# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मानोरा व कारंजा (जि.वाशिम) येथील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१) १२७१३ (०८-०४-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानोरा व कारंजा (जि.वाशिम) येथील ग्रामीण रुग्णालयात अनेक कर्मचा-यांची वर्ग अ ते ड पर्यंतची अनेक पदे रिक्त असून ती भरण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मानोरा येथे २८ पैकी ५ व कारंजा येथे २७ पैकी २ पदे रिक्त आहेत.

(२) ग्रामीण रुग्णालय, मानोरा व ग्रामीण रुगणालय, कारंजा वैद्यकीय अधिकाऱ्याची सर्व पदे भरलेली असुन, वैद्यकीय अधिक्षक हे पद शासन स्तरावरुन भरणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
वर्ग ३ व वर्ग ४ ची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(३) सदरहु रिक्त पदांचे कार्यवाही बाबत कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नाही.

---

**बोरगाव मंजु (ता.जि.अकोला) येथील ग्रामीण रुग्णालय मंजूरीबाबत**

**(२) २८१६४ (२७-१०-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरगाव मंजू (ता.जि. अकोला) येथील ग्रामीण रुग्णालय शासनाकडून मंजूर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयास जागा उपलब्ध करुन देण्यात स्थानिकरित्या अडचणी निर्माण झाल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०७-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ग्रामीण रूग्णालय बोरगावसाठी बोरगाव मंजू ग्रामपंचायतीने त्यांच्याकडील उपलब्ध ६ एकर जागा रूग्णालयासाठी उपलब्ध करून दिली आहे. सदर इमारतीचे अंदाज आराखडे तयार करण्यात आले असून निधी अभावी उच्च स्तर सचिव समितीने सदर प्रस्ताव नामंजूर केला. सबब ग्रामीण रूग्णालय बोरगाव करीता नियोजन विभागाच्या दि.११.०६.२०१८ च्या शासन परिपत्रकानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

**सताळा (ता.अहमदपुर, जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीत २१ गावांचा समावेश असल्याबाबत**

**(३) ३४८४७ (२१-०१-२०१६). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सताळा (ता. अहमदपुर, जि.लातूर) तालुक्यातील सताळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीत २१ गावांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आरोग्य केंद्रावर एकच वैद्यकीय अधिकारी असल्यामुळे रुग्णांना योग्य सेवा मिळत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या आरोग्य केंद्रामधील एक वैद्यकीय अधिकारी तसेच इतर १४ कर्मचारी यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या भागातील नागरिकांना योग्य आरोग्य सेवा मिळावी यासाठी रिक्त पदे भरणे आवश्यक असतानाही त्याकडे दुर्लक्ष होण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
प्राथमिक आरोग्य केंद्र, सताळा या केंद्राच्या हद्दीत १४ गावांचा समावेश आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची २ पदे मंजुर असून दोन्ही भरलेली आहेत. गट क व ड संवार्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे.

---

**मौजे लाखनवाडा व मौजे रोहणा (ता. खामगाव, जि. बुलढाणा ) ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(४) ४१४५९ (१०-०५-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लाखनवाडा व मौजे रोहणा (ता.खामगाव, जि.बुलढाणा) ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची व परिचारिकांची पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्रामीण भागातील रुग्णालयास आवश्यक असलेले ऑक्सिजन सिलेंडर, ओषधे, एन्टी रबीज लसी इत्यादी साहित्य नसल्यामुळे रुग्णसेवेवर त्याचा दुष्परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामीण भागातील रुग्णांना शहरात खाजगी रुग्णालयात उपचारासाठी यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत व उपरोक्त औषधे व साहित्य पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

| अ.क्र. | आरोग्य संस्था | संवर्ग | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामिण रूग्णालय लाखनवाडा, ता.खामगांव, जि. बुलढाणा | वैद्यकीय अधिक्षक | १ | ० | १ |
| | | वैद्यकीय अधिकारी | ३ | २ | १ |
| | | परिचारिका | ७ | ३ | |
| २ | प्राथमिक आरोग्य केंद्र मौजे रोहणा, ता.खामगांव, जि. बुलढाणा | वैद्यकीय अधिकारी | २ | २ | ० |
| | | आरोग्य सहाय्यक | २ | २ | ० |
| | | आरोग्य सेवक/ सेविका | १५ | १३ | २ |

(२) व (३) हे खरे नाही,

(४) प्राथमिक आरोग्य केंद्र रोहणा येथील २ आरोग्य सेवकांची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु असुन ती पदे भरण्यात येतील. शासनस्तरावरून औषधे व साहित्य पुरवठा नियमित असुन प्राथमिक आरोग्य केंद्रावर पुरेसा साठा उपलब्ध आहे. वैद्यकीय अधिक्षकाचे १ पद मंजुर असून ते रिक्त असल्याने सदर पदाचा कार्यभार सामान्य रूग्णालय, खामगांव येथील वैद्यकीय अधिकारी यांचेकडे दिलेला आहे.

(५) प्रश्न उद्भावत नाही.

### मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(५) ४१७७१ (१०-०५-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील सुमारे दोन ते अडीच लाख जनतेला आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात आला परंतु याठिकाणी डॉक्टर, कर्मचारी व वैद्यकीय सुविधा यांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुरबाड येथे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित झालेले नाही, तथापी सदर ग्रामीण रूग्णालयात आकृतीबंधानुसार एकुण २५ पदे मंजुर असून २१ पदे भरण्यात आलेली आहे व ४ पदे रिक्त आहेत. सदर रूग्णालयात वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रू.५४००) संवर्गाची ३ पदे मंजुर असून ३ पदे भरण्यात आलेली आहेत.

सदर अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत बाहयरूग्ण व आंतररूग्ण यांना आवश्यक त्या आरोग्य सुविधा पुरविण्यात येत आहेत व रूग्णालयामध्ये अत्यावश्यक औषध साठाही उपलब्ध आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अमडापूर (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जागा रिक्त असल्याबाबत

**(६) ४२११७ (१०-०५-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमडापूर (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टरांसह सहा जागा रिक्त असल्याने रुग्णांचे हाल होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र अमडापूर, ता.चिखली, जि.बुलढाणा येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण १४ पदे मंजुर असून १० पदे भरलेली व ४ पदे रिक्त आहेत. सदर पदांची माहिती पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | पदनाम | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ५४००) | २ | १ | १ |
| २ | आरोग्य सहायक | २ | ० | २ |
| ३ | स्वास्थ अभ्यगंता | १ | १ | ० |
| ४ | आरोग्य सेविका | ५ | ५ | ० |
| ५ | आरोग्य सेवक | ४ | ३ | १ |
| एकुण | | १४ | १० | ४ |

(२) शासन परिपत्रक दि. २४.०६.२०१६ मधील मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समितीमार्फत मुलाखतीद्वारे तसेच शासन स्तरावरुन स्वतंत्र निवड मंडळामार्फत वैद्यकीय अधिकारी गट-अ (पे बँड १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४००) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भ्ावत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील वैघकीय अधिकाऱ्यांची पद रिक्त असल्याबाबत**

**(७) ४३८६१ (१०-०५-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकलुज (जि.सोलापूर) येथील ग्रामीण आरोग्य केंद्रात तसेच जिल्हयातील अन्य सामान्य रुग्णालयात डॉक्टरांची १५३ पैंकी ५३ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टराच्या रिक्त पदामुळे रुग्णालयात तसेच आरोग्य केंद्रातील येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉक्टरांच्या रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली केली वा करण्यात येत आहे,

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे,

सोलापूर जिल्हयात एकुण ३ उपजिल्हा रूग्णालये, १३ ग्रामिण रूग्णालय, ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित आहेत.

सोलापूर जिल्हयात वैद्यकीय अधिकारी गट-अ ग्रेड पे ५४००/- संवर्गाची राज्यस्तरीय व जिल्हा स्तरीय मिळुन एकुण २४२ पदे मंजुर असून त्यापैकी २१२ पदे भरलेली असून ३० पदे रिक्त आहेत.

सोलापूर जिल्हयातील उक्त ३ उपजिल्हा रूग्णालये व १३ ग्रामीण रूग्णालयांसाठी वैद्यकीय अधिकारी गट-अ ग्रेड पे ५४००/-संवर्गाची एकुण ६८ पदे मंजूर असून ५९ पदे भरलेली व ९ पदे रिक्त आहेत.

उपजिल्हा रूग्णालय अकलुज जि. सोलापूर येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ५४००/-) संवर्गाची एकुण ७ पदे मंजुर असून ७ पदे भरलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ५४००) संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस अधिकारी देण्यात आलेले आहे. जिल्हाधिकारी यांच्यास्तरावरुन तसेच शासन स्तरावरुन स्वतंत्र निवड मंडळामार्फत वैद्यकीय अधिकारी गट-अ (पे बँड १५६००-३९१०० + ग्रेड पे रु.५४००) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**साकोली, लाखनी व लाखंदूर (जि.भंडारा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांबाबत**

**(८) ४५१७० (११-०५-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोली, लाखनी व लाखंदूर (जि.भंडारा) या तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या ग्रामीण रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची तसेच आरोग्य सेविकांची मंजूर पदे पुर्णपणे कधीच भरली जात नसून रक्तचाचणी सुविधा, जनरेटर व विद्युत सुविधांचा नेहमी अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयांमध्ये आरोग्य सेविकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असून साकोली सारख्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये कार्यरत १० आरोग्य सेविकांपैकी सलग ५ सेविकांना बदलीचे आदेश आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सेविकांची मंजूर पदे तातडीने भरुन बदलीस पात्र सेविकांचे बदली करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

भंडारा जिल्हयातील उपजिल्हा रूग्णालय, साकोली येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ ग्रेड पे ५४००/-संवर्गाची एकुण ७ पदे मंजुर असून ७ पदे भरलेली आहेत. ग्रामिण रूग्णालय लाखनी

येथे वैद्यकीय अधिकारी, गट-अ ग्रेड पे ५४००/- संवर्गाची एकुण ३ पदे मंजुर असून ३ पदे भरलेली आहेत.

उक्त आरोग्य संस्थासाठी आरोग्य सेविकांची पदे मंजूर नाहीत.

उपजिल्हा रूग्णालय साकोली व ग्रामिण रूग्णालय लाखांदूर येथे जनरेटर सुविधा उपलब्ध आहे. तथापि लाखांदुर येथील जनरेटर बंद असून दुरुस्त करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. ग्रामिण रूग्णालय लाखनी येथे जनरेटर सुविधा उपलब्ध नाही.

(२) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

सदर रुग्णालयामध्ये अधिपरिचारीकांची पदे मंजुर आहेत. साकोली उपजिल्हा रुग्णालयामध्ये ५ अधिपरिचारीकांच्या बदल्या मे २०१५ मध्ये करण्यात आल्या होत्या. तसेच मे २०१६ च्या सर्वसाधारण बदल्यांमध्ये ४ अधिपरिचारकांची बदली उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे करण्यात आल्या आहेत.

(३) व (४) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे ५४००) संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीस अधिकार देण्यात आलेले आहे. जिल्हाधिकारी यांच्यास्तरावरुन तसेच शासन स्तरावरुन स्वतंत्र निवड मंडळामार्फत वैद्यकीय अधिकारी गट-अ (पे बँड १५६००-३९१०० + ग्रेड पे रु.५४००) या सवंर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**जळगांव जिल्हा रुग्णालयातील जागा रिक्त असल्याबाबत**

**(९) ४८७४८ (११-०५-२०१६). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा रुग्णालयात एक तृतीयांश जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील रुग्णांना वैद्यकिय अधिकारी व कर्मचाऱ्यांअभावी खाजगी रुग्णालयांत जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या रिक्त जागा तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, जळगाव येथे खालीलप्रमाणे मंजुर, भरलेली व रिक्त पदे आहेत.

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वर्ग-१ | १९ | ६ | १३ |
| वर्ग-२ | ३५ | ३४ | १ |
| वर्ग-३ | २६६ | २०८ | ५८ |
| वर्ग-४ | १९३ | १४० | ५३ |
| एकुण | ५१३ | ३८८ | १२५ |

(२) हे खरे नाही.

(३) वर्ग १ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. तसेच वर्ग-३ व वर्ग-४ ची रिक्त पदे भरण्याबाबत क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची गैरहजेरी व औषधांचा तुटवडा असल्याबाबत**

**(१०) ५०७९२ (११-०५-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील ६५ प्राथमिक आरोग्य केंद्रात अनेक ठिकाणी वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता असून कर्मचाऱ्यांसह काही केंद्रावर औषधांचा तुटवडा असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन प्राथमिक आरोग्य केंद्रात गैरहजर वैद्यकीय अधिकाऱ्यांवी कारवाई करण्यासोबतच येथे नियमित औषधांचा पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

नांदेड जिल्हयात एकुण ६५ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्राना वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे-५४००) संवर्गाची प्रत्येकी २ याप्रमाणे एकुण १३० पदे मंजुर असून १३० पदे भरलेली आहे.

उक्त ६५ प्राथमिक आरोग्य केंद्रात औषध साठा उपलब्ध आहे.

(२) सदर कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी गैरहजर असणाऱ्या डॉक्टरावर कारवाई सुरु आहे.

नांदेड जिल्हयातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रावर दि.३१.०१.२०१६ रोजी औषधे उपलब्ध आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयातील रिक्त पदे भरणेबाबत**

**(११) ६४५११ (३०-०८-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी शासकीय जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व तंत्रज्ञांची पदे रिक्त असून रुग्णालयातील सीटी स्कॅन मशीन बंद आहे तसेच डायलेसिस सुविधाही अपुरी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा रुग्णालयातील सदरची रिक्त पदे भरणे व आवश्यक सोयी तातडीने उपलब्ध होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रूग्णालय रत्नागिरी हे २०० खाटांचे रूग्णालय असून एकूण मंजुर ६१ पदांपैकी ३४ पदे भरलेली आहेत व २७ पदे रिक्त आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत तंत्रज्ञांची पदे भरलेली असून ४ डायलेसिस मशिनद्वारे डायलिसीस सुविधा दिली जात आहे. जुने सिटी स्कॅन मशीन निर्लेखित करुन नविन मशिन उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही चालु आहे. बाह्ययंत्रणेमार्फत बीपीएल रुग्णांना मोफत व इतरांना अल्पदरात सीटी स्कॅन सुविधा दिली जात आहे.
(२) जिल्हाधिकारी स्तरावरील गठीत समितीमार्फत तसेच शासनस्तरावरुन वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे-५४००) संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.६६००/-) संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयामध्ये ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत**

**(१२) ६७७१२ (१०-०१-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जवळपास २५ टक्के जागा अद्याप रिक्त असून यामध्ये प्रामुख्याने स्त्री रोग तज्ञ, हृदयविकार तज्ञ, मेंदू विकार तज्ञ व भुल तंज्ञाची पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, शासनाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयामध्ये एकुण १६ ग्रामिण रूग्णालये व ७३ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित आहेत.

सदर आरोग्य संस्थापैकी ग्रामिण रूग्णालयांना वैद्यकीय अधिकारी संवर्गाची प्रत्येकी तीन पदे याप्रमाणे एकुण ४८ पदे मंजुर असून ३७ पदे भरलेली व ११ पदे रिक्त आहेत. सदर भरलेल्या ३७ पदांमध्ये १६ स्त्रीरोगतज्ञ, ६ भुलतज्ञ, १२ बालरोग तज्ञ समाविष्ठ आहेत. शासनाच्या मंजुर आकृतीबंधानुसार ग्रामिण रूग्णालयांना ह्दयविकारतज्ञ, मेंदुविकारतज्ञांची पदे मंजुर नाहीत.

तसेच ७३ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी संवर्गाची प्रत्येक २ पदे याप्रमाणे एकुण १४६ पदे मंजुर असुन १०१ पदे भरलेली व ४५ पदे रिक्त आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांना वैद्यकीय अधिकारी संवर्गातील विशेषज्ञांचे पद मंजूर नाही.

(२) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे-५४००) संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

### सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१३) ७०२६७ (१०-०१-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात दोन वैद्यकीय अधिकारी व तीन अधिपरिचारीका यांची रिक्त भरण्याबाबत तेथील ग्रामस्थांनी, लोकप्रतिनिधींनी मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक २१ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वैद्यकीय अधिक्षक | १ | ० | १ |
| वैद्यकीय अधिकारी ग्रे पे ५४०० | ३ | २ | १ |
| अधिपरिचारिका | ७ | ६ | १ |
| एकुण | ११ | ८ | ३ |

(२) वैद्यकीय अधिक्षक, वर्ग-१ संवर्गाची रिक्त पदे तसेच वैद्यकीय अधिकारी गट अ ची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**सातारा जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(१४) ७०७४० (१०-०१-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील ७४ ठिकाणी वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे संपूर्ण जिल्हयात आरोग्य सेवा सुरळीत नसल्याचे धक्कादायक वास्तव माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वैद्यअधिकारी व अधिकारी ही पदे तातडीने भरण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०७-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे सप्टेंबर २०१६ मध्ये सातारा जिल्हयात वैद्यकीय अधिकारी, गट-अ ग्रेड पे रू.५४००/- संवर्गाची राज्यस्तर व जिल्हास्तरावरील मिळुन एकुण २५५ पदे मंजूर असून त्यापैकी २०७ पदे भरलेली व ५४ पदे रिक्त होती. सद्यस्थितीत २५७ पदांपैकी २१६ पदे भरलेली व ४१ पदे रिक्त आहेत.

ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत अश्या ठिकाणी जिल्हयातील अन्य प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत व राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांअंतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत पर्यायी व्यवस्था करण्यात येऊन आरोग्य सेवा सुरळीत व नियमित पुरविल्या जात आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) शासनाने जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीस दिलेल्या अधिकारानूसार सातारा जिल्हयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची १२ पदे भरण्यात आली आहेत. तसेच शासनस्तरावरूनही वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भावत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात राष्ट्रीय कुटूंब कल्याण उपक्रमाअंतर्गत नसबंदी केलेल्या रुग्णांना संसर्ग झाल्याबाबत**

**(१५) ७२२८४ (१०-०१-२०१७). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रात राष्ट्रीय कुटूंब कल्याण उपक्रमाअंतर्गत माहे सप्टेंबर, २०१६ वा त्यादरम्यान १०० पेक्षा जास्त पुरूष रुग्णांवर नसबंदी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नसबंदी करण्यात आलेल्या पैकी काही रूग्णांना संसर्ग (इन्फेक्शन) झाल्यामुळे त्यांची प्रकृती खालावली असल्याच्या कारणास्तव सामान्य रूग्णालय, गडचिरोली येथे भरती करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रूग्णांना कशामुळे संसर्ग (इन्फेक्शन) झाले याची चौकशी केली काय,

(४) असल्यास, शस्त्रक्रिया करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-१२-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भावत नाही.

---

**वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य विभाग, यवतमाळ यांनी प्रोत्साहन भत्याची अतिरीक्त रक्कम अदा केल्याबाबत**

**(१६) ७३०३८ (१०-०१-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन निर्णय दिनांक ६ ऑगस्ट, २००२ नुसार नक्षलग्रस्त भागामध्ये कार्यरत आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येत होता सदर प्रोत्साहन भत्ता दिनांक २० एप्रिल २०११ च्या परीपत्रकामुळे रदद करण्यात आल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य विभाग, यवतमाळ यांनी माहे एप्रिल, २०११ नंतर ५ वर्षामध्ये ६ वैद्यकीय अधिका-यांना प्रोत्साहन भत्यापोटी तब्बल रू ४३ लाख इतकी अतिरीक्त रक्कम अदा केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २० एप्रिल २०११ च्या परीपत्रका विरूध्द शासनाला रू ४३ लाखाचा भुर्दंड देणा-या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अतिरिक्त प्रदान करण्यात आलेली रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. तथापि, संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास न्यायालयाकडुन स्थगिती मिळविली असून सद्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. शासनाचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

(४) वरील प्रमाणे कार्यवाही सुरू केल्याने विलंबाचा प्रश्न उद्भावत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) शहरातील उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील रिक्त पदे भरणेबाबत**

**(१७) ७३७७६ (१३-०१-२०१७). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) शहरातील उपजिल्हा सामान्य रुग्णालयात वैद्यकिय अधिकारी, नर्सेस व डायलिसीस टेक्नीशीयनची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्यामुळे उपचारार्थ आलेल्या रुग्णांना अकोला येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खामगाव उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील रिक्त जागा भरण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

बुलढाणा जिल्हयातील खामगाव तालुक्यात २२० खाटांचे सामान्य रुग्णालय कार्यन्वित आहे. सदर रूग्णालयातगट-अ ते गट ड संवर्गाची एकुण २३० पदे मंजुर असुन १५७ पदे भरलेली व ७३ पदे पदे रिक्त आहेत.

सदर रूग्णालयात ४ डायलीसीस यंत्रे उपलब्ध आहेत. सदर डायलीसीस यंत्रे चालविण्यासाठी ३ डायलीसीस टेक्नीशिअन कंत्राटीपध्दतीने कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रु.६६००/-) मधील निव्वळ जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील पदोन्नती कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या सूचनानुसार शासन आदेश हे दि. ०९.०५.२०१८ अन्वये पदोन्नती देण्यात आल्या आहेत. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच नामनिर्देशन कोट्यातील रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००) संवर्गाची रिक्त पदे शासन स्तरावर तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत जिल्हा निवड समिती मार्फत भरण्यात येत आहेत.

गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत भरती प्रक्रिया क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भावत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हा शासकीय रुग्णालयात रुग्णांना वैद्यकीय साहित्य एका ठराविक मेडीकल मधूनच आणण्याबाबत करण्यात येणारी सक्ती**

**(१८) ८३४६७ (१८-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा शासकीय रुग्णालयात रुग्णांना वैद्यकीय साहित्य एका ठराविक मेडीकल मधूनच आणायची सक्ती संबंधित डॉक्टरांकडून केली जात असल्यामुळे याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयातील गैरप्रकाराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०७-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही. निवेदन संचालनालयास प्राप्त झालेले नसून दै.दिव्य मराठी या वृत्त पत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२), (३) व (४) होय, आरोग्य संचालनालय स्तरावर चौकशी करण्यात आली आहे. चौकशीअंती संबंधीत जबाबदार वैद्यकीय अधिकाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव संचालनालयाने शासनास दि.१८.१.२०१८ च्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यावर शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

---

### नागपूर शहरातील प्रादेशिक मनोरूग्णालयातील डॉक्टरांच्या बदलीबाबत

**(१९) ८५०६० (२१-०८-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील प्रादेशिक मनोरूग्णालयातील डॉक्टरांची मागील १७ वर्षापासून बदली झाली नसल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने नागपूर शहरासह जिल्हयातील वर्ग-२ डॉक्टरांच्या बदल्या दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यादरम्यान केल्या असुन त्या बदली आदेशांमध्ये एकाच ठिकाणी अनेक वर्षापासुन कार्यरत असलेल्या प्रादेशिक मनोरूग्णालयाच्या ५ डॉक्टरांच्या नावांचा समावेश करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रूग्णालयामधील एकाच पदावर अनेक वर्षापासुन कार्यरत असलेल्या डॉक्टरांची बदली करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, बदली न करण्याची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.
मागील अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथील वैद्यकीय अधिकारी यांच्या बदल्या करण्यात आलेल्या नाहीत.
(२) हे खरे आहे.
शासन आदेश दिनांक ३१/०५/२०१७ मध्ये प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथील बदलीपात्र वैद्यकीय अधिकारी यांचे नाव समाविष्ट नाही.

(३) बदली अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार बदलीपात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत सन २०१९ च्या सर्वसाधारण बदल्यांच्या वेळी कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‍भ्‍ावत नाही.

---

**मंचर (जि.पुणे) येथील उपजिल्हा रुग्णालयातील दुरवस्थेबाबत**

**(२०) ८५५३८ (११-०८-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंचर (जि.पुणे) उपजिल्हा रुग्णालयामध्ये डॉक्टर, भूलतज्ञ व इसीजी तंत्रज्ञ नसल्याने १० खाटांचे आयसीयू (ICU) यूनिट व एक्सरे मशीन बंद पडल्या आहेत तसेच क व ड वर्गातील कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयांतील त्रुटींमुळे अनेक रुग्णांना खाजगी रुग्णालयाकडे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय, मंचर, जि.पुणे येथे ५ बेडचे आय.सी.युनिट संलग्न आहे. सदर रुग्णालयास वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकुण २० पदे मंजुर असून त्यापैकी १७ पदे भरलेली व ३ पदे रिक्त आहेत. सदर भरलेल्या पदांमध्ये १ भुलतज्ञ कार्यरत आहे. तसेच रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक भुलतज्ञ आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, भुलतज्ञ, सर्जन इत्यादी विशेषज्ञांच्या ऑन कॉल सेवा घेऊन रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

तसेच नियमित भिषक कार्यरत नसल्यामुळे एनएचएम अंतर्गत ऑन कॉल फिजिशियन यांच्या सेवा घेण्यात आल्या आहेत. तथापि नियमित फिजिशियन प्रत्यक्ष कार्यरत नसल्याने सद्यस्थितीत आय.सी.यु. बंद आहे.

ई.सी.जी. तंत्रज्ञ पद भरलेले असुन ई.सी.जी. सेवा उपलब्ध आहे. एक्स-रे मशिन सुस्थितीत असुन रुग्णांना सेवा उपलब्ध आहेत.

गट-क संवार्गाची एकुण ५८ पदे मंजुर असुन त्यापैकी ४५ पदे भरलेली असुन १३ पदे रिक्त आहेत. तसेच गट-ड संवर्गात एकुण २४ पदे मंजुर असुन त्यापैकी १६ पदे भरलेली व ८ पदे रिक्त आहेत.

सदर रुग्णालयात रुग्णालय बळकटीकरणांतर्गत खाजगी स्त्रीरोगतज्ञांचे पॅनेल तयार करुन गरोदर माता व डिलेव्हरी रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत. सदर रुग्णालयात उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत रुग्णांना २४ तास विशेषज्ञ सेवा उपलब्ध आहेत. तसेच रुग्णांना उपचारापासुन वंचित रहावे लागणार नाही याची दक्षता घेण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

(५) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

## माणगांव (जि. रायगड) तालुक्यातील उपजिल्हा रूग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२१) ८६७२७ (१९-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव (जि. रायगड) तालुक्यातील उपजिल्हा रूग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मंजूर करण्यात आलेल्या १५ पदांपैकी वैद्यकीय अधिक्षक-१, वैद्यकिय अधिकारी-२, वैद्यकीय अधिकारी-३ अशी ५ रिक्त पदे तातडीने भरावयाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावरील माणगांव शहरातील अपघातांमध्ये गंभीर दुखापत झालेल्या रूग्णांना डॉक्टर व कर्मचाऱ्याच्या रिक्त पदांमुळे वेळीच उपचार मिळत नसल्यामुळे मुंबई किंवा अलिबाग येथे उपचारासाठी घेऊन जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माणगांव व आजुबाजूच्या परिसरातील गरिब व गरजू रूग्णांना हे एकमेव हॉस्पिटल असल्यामुळे रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या पदांमुळे उपस्थित अधिकाऱ्यावर अतिरिक्त भार येत असल्यामुळे उपचाराविना रूग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने रूग्णांना तातडीने आरोग्य सेवा पुरविण्यासाठी रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

केवळ अत्यवस्थ गंभीर रुग्णांना पुढील उपचारार्थ संदर्भित केले जाते.

(३) हे खरे नाही.

(४) मवैआसे गट-अ (ग्रेड पे ६६००) व (ग्रेड पे ५४००) मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच गट-क व गट-ड संवर्गातील मंडळ स्तरावरील रिक्त पदे भरण्यासाठी माहे जानेवारी २०१७ मध्ये लेखी परिक्षा घेण्यात आली असून, सदर पदावर निवड झालेल्या उमेदवारांमधून उपजिल्हा माणगांव येथील रूग्णालयामध्ये प्रयोगशाळा तंत्रज्ञ, वैज्ञानिक अधिकारी १ पद व कक्षसेवक-३ पदे भरण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्भावत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शासकीय उपजिल्हा रुग्णालयाची झालेली दुरवस्था**

**(२२)** *८८८५२* **(१९-०८-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णाना डॉक्टरांच्या व प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे अद्ययावत उपचार मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी रुग्णालय प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर रूग्णालयात वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१ हे पद मंजुर असून ते भरलेले आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ ची एकुण ७ पदे मंजुर असुन आकृतीबंधानुसार विशेषज्ञांसह वैद्यकीय अधिकाऱ्यांची ६ पदे भरलेली आहेत. त्यांचेकडून उपचारार्थ आलेल्या रूग्णांना चांगल्या रूग्णसेवा पुरविल्या जात आहेत.

रूग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांना रूग्णसेवा पुरविल्या जात असल्यामुळे डॉक्टरांच्या व प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे अद्ययावत उपचार मिळत नाही असे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही.

(४) प्रश्न उद्भावत नाही.

---

**आरोग्य सेवा अकोला, मंडळाचे उपसंचालक यांच्या पत्नीची चौकशी करण्याचे आदेश**

**(२३) ९१८६९ (१९-०८-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य सेवा अकोला, मंडळाचे उपसंचालक डॉ.नितीन अंबाडेकर यांच्या पत्नी डॉ.शुभांगी अंबाडेकर यांच्या अकोला जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातून यवतमाळ येथे झालेली प्रतिनियुक्ती तसेच त्या खासगी प्रॅक्टिस करीत असल्याबाबतची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री कार्यालयाने आरोग्य संचालकांना माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) होय.

डॉ. शुंभागी अंबाडेकर यांनी त्याच्या खासगी व्यवसायाबाबत व व्यवसायरोध भत्याबाबत मा. उच्च न्यायालय, नागपूर बेंच येथे रिट पिटीशन क्र. ४३६२/२०१५ दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यानुसार त्यांचा व्यवसायरोध भत्ता बंद करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भ‍ावत नाही.

---

**डोगंरखर्डा (ता.कळंब) येथील आरोग्य उपकेद्र बंद असल्याने रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२४) ९२३४८ (१९-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोगंरखर्डा (ता.कळंब) परीसरातील नागरींकांना आरोग्य उपकेद्रांत डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचारी मुख्यालयी राहावे म्हणुन शासकिय निवासस्थाने बांधण्यात आले परंतु डॉक्टर मुख्यालयी राहात नसल्याने तेथील कर्मचारी आरोग्य उपकेंद्र बंद ठेवत असल्याचे दिनांक २६ एप्रिल २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य अधिकारी, कळंब तालुका यांनी उपकेद्राला भेट दिली असता अनेक कर्मचारी गैरहजर असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून गैरहजर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सेविका यांचे एक दिवसाची सेवा विनावेतन करुन गैरहजर राहिल्यास सेवा समाप्त केली जाईल,याबाबत समज देण्यात आली आहे.तसेच नियमित औषधनिर्माण अधिकारी, आरोग्य सेवक व आरोग्य सहायक यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणामकारक न ठरता रोखण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भावत नाही.

---

**भामरागड (जि. गडचिरोली) जंगलात नक्षलवाद्यांनी घडविलेल्या भूसुरुंग स्फोटात जखमी झालेल्या जवानांवर उपचार करण्यास नागपूर येथील रुग्णालयांनी नकार दिल्याबाबत**

**(२५) ९२८५१ (२१-०८-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड (जि. गडचिरोली) जंगलात नक्षलवाद्यांनी घडविलेल्या भूसुरुंग स्फोटात जखमी झालेल्या २० जवानांवर उपचार करण्यास नागपूर येथील काही नामांकित रुग्णालयांनी नकार दिल्याचे दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार शासनाने संबंधित रुग्णालयांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भावत नाही.

(३) प्रश्न उद्‌भावत नाही.

(४) प्रश्न उद्‌भावत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) मध्यवर्ती रूग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२६) ९८८४३ (०६-०१-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) मध्यवर्ती रूग्णालयात मंजूर पदांपैकी गायनकोलॉजिस्टची ५, ओटोलोरिंगोलोजिस्टची २, डेन्टीस्टची २, फिजिशियन्सची २, रेडीओलॉजिस्टचे १, ॲनेस्थेसिया १, डायलेसीस तज्ञचे -१ अशी रिक्त पदे आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मध्यवर्ती रुगणालय, उल्हासगनर, जि.ठाणे येथे विशेषज्ञाच्या मंजुर पदांपैकी स्त्रीरोगतज्ञ, कान, नका, घसा तज्ञ, फिजीशियन यांचे प्रत्येकी १ पद रिक्त आहे परंतु दंतशल्यचिकित्सक, क्ष-किरणतज्ञ, भुलतज्ञ यांची मंजुर पदे भरलेली आहेत.

(२) वैद्यकीय अधिकारी गट-अ, वर्ग-१ (ग्रेड पे रु. ६६००/-) संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे. राज्यातील म.वै.आ.से.गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी ७२३ रिक्त पदांची जाहिरात दि. १३.०७.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भ्‌ावत नाही.

---

**आष्टी व पाटोदा (जि. बीड) ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२७) १००५८९ (०३-०१-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी व पाटोदा (जि.बीड) ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याची गंभीर बाब माहे नोव्हेंबर २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय आष्टी, जि.बीड येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण २५ पदे मंजुर असुन १९ पदे भरलेली व ६ पदे रिक्त आहेत. ग्रामीण रुग्णालय पाटोदा, जि.बीड येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकुण २५ पदे मंजूर असुन २२ पदे भरलेली व ३ पदे रिक्त आहेत. ग्रामीण रुग्णालय आष्टी येथील वैद्यकीय अधिक्षकांचे एक पदाव्यतिरिक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांची सर्व पदे भरलेली आहेत.

(२) वित्त विभाग, शासन निर्णय दि. १६.०५.२०१८ अन्वये राज्यातील रुग्णसेवेशी संबंधित रिक्त पदे १०० टक्के भरण्यास मान्यता दिली आहे.

म.वै.आ.से.वर्ग-१ संवर्गाची रिक्त पदे भरणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनबँड रु.१५६००-३९१००,ग्रेड पे रु.५४००/-) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यास जिल्हाधिकारी यांना अधिकार प्रदान केले आहेत. राज्यस्तरावरुन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ७२३ रिक्त पदांची जाहिरात दि.१३.०७.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.
वित्त विभागाच्या दिनांक ०२ जुलै, २०१५ व १७ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार रुग्णसेवेशी संबंधीत संवर्गातील रिक्त पदांच्या ७५ टक्के पदे भरण्यास मंजूरी देण्यात आली होती. त्यानुसार गट क च्या २३ संवर्गातील २७६९ उमेदवारांची निवड होऊन त्यांना माहे सप्टेंबर/ऑक्टोबर २०१७ मध्ये नियुक्ती देण्यात आलेली आहे. गट ड ची १२६४ पदे माहे सप्टेंबर/ ऑक्टोबर २०१७ मध्ये भरली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका व सेवकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२८) १०१५९३ (०३-०१-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील ५ प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका व सेवकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागांतर्गत ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३२ उप प्राथमिक आरोग्य केंदे असतांना पंचायत समितीमध्ये आरोग्य विभागासाठी विस्तारित अधिकाऱ्यांचे एक पद मंजूर असून ते ही रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व रिक्तपदे भरण्याच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.
सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात एकुण ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित आहेत. सदर ५ आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी संवर्गाची एकुण १० पदे मंजूर असुन १० पदे भरलेली आहेत. आरोग्य सेवकांची एकुण ३४ पदे मंजूर असुन २१ पदे भरलेली असुन १३ पदे रिक्त आहेत. तसेच आरोग्य सेविकांची ३६ पदे मंजूर असुन त्यापैकी २९ पदे भरलेली व ७ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात एकुण ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित असुन त्याअंतर्गत एकुण ३२ उपकेंद्रे कार्यन्वित आहेत. विस्तार अधिकारी हे पद रिक्त असुन पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) सदरची पदे ही आंतरजिल्हा बदलीने, नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने रिक्त झाली आहेत. शासन निर्णय वित्त विभाग दि. १६.०५.२०१८ अन्वये आरोग्य सेवेशी संबंधित नामनिर्देशनाची पदे १०० टक्के भरणेबाबत मान्यता देण्यात आली असुन त्यानुषंगाने गट क व गट ड संवर्गातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात पुढील कार्यवाही सुरु आहेत. विस्तार अधिकारी हे पद पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**नेवासा फाटा (जि. अहमदनगर ) येथील ग्रामीण रुग्णालयात**
**बाहय व आंतररुग्ण सेवा बंद असल्याबाबत**

**(२९) १०७८७३ (३१-०३-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा फाटा (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयात नेमणूकीस असलेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांचा ११ महिन्याचा करार संपल्याने दुसऱ्या वैद्यकिय अधिकाऱ्यांची नेमणूक न झाल्यामुळे गेल्या महिन्याभरापासून बाहय व आंतर रुग्ण सेवा बंद होती, हे खरे आहे काय,
(२) तसेच या रुग्णालयात कायमस्वरुपी वैद्यकिय अधिक्षक नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णालयात कायमस्वरुपी वैद्यकिय अधिक्षक व वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
ग्रामीण रुग्णालय, नेवासा येथील वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१ चे पद दिनांक २५/०७/२०१६ पासुन बदलीने रिक्त झाले असुन सदर पदाचा कार्यभार ग्रामीण रुग्णालय नेवासा येथील वैद्यकीय अधिकारी, वर्ग-२ यांचेकडे सोपविण्यात आला आहे.
(३) म.वै.आ.से. गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरणेबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
शासन परिपत्रक दि. २४.०६.२०१६ च्या मार्गदर्शक सुचनानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीमार्फत मुलाखतीद्वारे वैद्यकीय अधिकारी,गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हास्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ग्रामीण व प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३०) १०८०५९ (०१-०४-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यातील ग्रामीण व प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी, स्त्री रोग तज्ञ, हृदयविकार तज्ञ, मेंदूविकार तज्ञ तसेच भूलतज्ञ यांच्या रिक्त पदांमुळे रुग्णांना जिल्हयाच्या ठिकाणी जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन उक्त तालुक्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यात १ ग्रामीण रुग्णालय व ९ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यन्वित आहेत. शासनाच्या आरोग्य संस्थेसाठीच्या मंजूर आकृतीबंधानुसार ग्रामीण रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिकारी,गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची एकुण ३ पदे मंजुर आहेत. मलकापुर या ग्रामीण रुग्णालयात मंजूर ३ पदावर स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ व भुलतज्ञ असे एकुण ३ विशेषज्ञ मंजूर आहेत. सदर ३ पदांपैकी १ पदावर स्त्रीरोगतज्ञ व २ पदांवर बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. ग्रामीण रुग्णालयासाठी आकृतीबंधानुसार हृदयविकार व मेंदुविकारतज्ञाची पदे मंजुर नाहीत. ग्रामीण रुग्णालय, मलकापूर येथे प्रतिनियुक्तीने विशेषज्ञांच्या सेवा रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

शाहूवाडी तालुक्यात कार्यन्वित असलेल्या एकुण ९ प्राथमिक आरोग्य केंद्रांना वैद्यकीय अधिकारी संवर्गाची प्रत्येकी २ पदे याप्रमाणे एकुण १८ पदे मंजुर असुन त्यापैकी ९ पदे भरलेली व ९ पदे रिक्त आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांना विशेषज्ञांचे पद मंजूर नाही.

शाहूवाडी तालुक्यातील ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये एकही वैद्यकीय अधिकारी कार्यरत नाही अशा ठिकाणी अन्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असुन रुग्णांची तात्पुरती पर्यायी व्यवस्था करणेत आली आहे. तसेच जिल्हा परिषद स्वनिधीमधून कंत्राटी स्वरुपात दरमहा रु. २०,०००/- मानधनतत्वावर बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांची ६ महिन्याकरीता तात्पुरती नियुक्ती केलेली आहे.

(२) जिल्हास्तरावर गठित समितीमार्फत तसेच शासनस्तरावर वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु. ५४००/-) या संवर्गाची नामनिर्देशनाने स्वतंत्र निवडमंडळामार्फत वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तुमसर (जि.भंडारा) येथे सुभाषचंद्र बोस शासकीय उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व तज्ञांची पदे निर्माण करुन तात्काळ भरण्याबाबत**

**(३१) १०९१९२ (०१-०४-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) येथे सुभाषचंद्र बोस शासकीय उपजिल्हा रुग्णालयात कान, नाक, घसाचे वैद्यकिय अधिकारी, त्वचारोग तज्ञ, विकृतशात्र तज्ञांचे पद निर्माण करून तात्काळ भरणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.आरोग्य मंत्री यांना दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) उपजिल्हा रूग्णालय येथे दि. २३.१२.२००२ च्या शासन निर्णयान्वये मंजूर आकृतीबंधानुसार कान, नाक, घसा तज्ञ, त्वचारोग तज्ञ, शरीरविकृतीशास्त्र तज्ञांची पदे मंजूर नाही.

(३) प्रश्न उद्‌भ‍ावत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील ग्रामीण रुग्णालय जिल्हा उपरुग्णालय व जिल्हा रुग्णालयात एम.बी.बी.एस. डॉक्टरांची नियुक्ती किंवा पदभरती करण्याची मान्यता देण्याबाबत**

**(३२) १०९३३९ (३१-०३-२०१८). डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात ७०% वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयामध्ये पी.जी व डिप्लोमाधारक वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत अनेकदा शासनाकडे जिल्हयातील वैद्यकीय सेवा सुरळीत करण्यासाठी गडचिरोली जिल्हयासाठी खास बाब म्हणून एम.बी.बी.एस धारक डॉक्टरांना नियुक्ती व पदभरतीसाठी मान्यता देण्याबाबत पत्र व्यवहार झालेला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) गडचिरोली जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ ची एकुण मंजुर पदे २२८ असुन १४७ पदे भरलेली असुन ८१ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये म.वै.आ.से. गट-अ (ग्रेड पे रु.६६००/-) चे ११ विशेषज्ञ कार्यरत आहेत व वैद्यकीय अधिकारी, गट-अ, ग्रेड पे रु. ५४००/- संवर्गातील कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये एकुण १६ विशेषज्ञ आहेत. तसेच गडचिरोली जिल्ह्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत विशेषज्ञ कार्यरत आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) आदिवासी दुर्गम नक्षलग्रस्त भागातील वैद्यकीय अधिकारी (ग्रेड पे रु. ५४००/-) संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी शासन आदेश दि. १९/०६/२०१७ व दि. १६/११/२०१६ अन्वये निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीमार्फत गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम नक्षलग्रस्त आदिवासी भागातील कोरची, एटापल्ली, भामरागड,अहेरी,सिरोंचा तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी संगर्वाची एकुण १२ पदे भरण्यात आली. राज्यातील म.वै.आ.से. गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे जिल्हाधिकारी स्तरावरुन भरण्याची प्रक्रिया राबवुन सुध्दा सदर पदे रिक्त रहात असल्यामुळे राज्यस्तरावरुन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ७२३ रिक्त पदांची जाहिरात दि. १३/०७/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भावत नाही.

---

**महाळुंगे-पडवळ (ता. आंबेगाव, जि.पुणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मुख्य वैदयकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३३) १०९७८२ (०१-०४-२०१८). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाळुंगे-पडवळ (ता. आंबेगाव, जि.पुणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मुख्य वैदयकीय अधिकाऱ्यांच्या तीन जागा तीन महिन्यांपासून रिक्त असल्याने रुग्णांची तपासणी करुन त्यांना औषधे व गोळया देण्याचे काम महिला परिचारकांनाच करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कक्षेत असलेल्या तालुक्याच्या पश्चिम व उत्तर भागातील २७ उपकेंद्रातील १३ गावातील रुग्णांना आरोग्याच्या सुविधा मिळण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र महाळुंगे पडवळ ता. आंबेगाव, जि.पुणे येथे वैद्यकीय अधिकारी यांची दोन पदे मंजुर असुन दोन पदे भरलेली आहेत. सदर वैद्यकीय अधिकारी बाह्यरुग्ण व आंतररुग्ण विभागामध्ये येणाऱ्या रुग्णांना वैद्यकीय सेवा देत आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र महाळुंगे पडवळ च्या कार्यकक्षेत १० उपकेंद्र कार्यन्वित आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यकक्षेत असलेल्या उपकेंद्रांमध्ये नियमित तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत कार्यरत आरोग्य सेविकांमार्फत रुग्णांना प्राथमिक आरोग्य सेवा पुरविल्या जात आहेत.

(३) वित्त विभाग, शासन निर्णय दि. १६.०५.२०१८ अन्वये गट क व गट ड संवर्गाची रुग्णसेवेशी संबंधित १०० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भ्‍ावत नाही.

---

**नाशिक जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३४) १११२८५ (०१-०४-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वात जास्त खाटांचे रुग्णालय असलेल्या नाशिक जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची ६० पेक्षा अधिक पदे रिक्त असल्याने रुग्णांना आरोग्याच्या सुविधा वेळेवर मिळत नसल्याची बाब माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दररोज सरासरी एक हजार रुग्णांवर उपचार होणाऱ्या या रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यास शासनाकडून अद्यापही परवानगी मिळाली नसल्याने नवीन वर्षात देखील सदर पदे रिक्त राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय नाशिक येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ ते वैद्यकीय अधिकारी गट-ब संवर्गाची एकुण ६४ पदे मंजुर असून त्यापैकी वैद्यकीय अधिकारी गट-अ ग्रेड पे (रु.५४००/-) ची सर्व मंजूर ४२ पदे भरली असून गट-अ ग्रेड पे (रु.६६००/-) ची २१ पदे मंजूर असून १२ पदे

भरली आहेत व ९ पदे रिक्त आहेत.
जिल्हा रुग्णालयात येणाऱ्या सर्व रुग्णांना तात्काळ मुलभूत आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) म.वै.आ.से.,गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१००, ग्रेड पे रु. ६६००/-) संवर्गातील पदोन्नतीची व सरळसेवेची रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दि.१६.०५.२०१८ अन्वये रुग्णसेवेशी संबंधित १०० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता दिलेली असुन त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करंजी (ता. केळापुर, जि. यवतमाळ) येथील ग्रामिण रूग्णांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(३५) ११२६४७ (३१-०३-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करंजी (ता. केळापुर, जि. यवतमाळ) येथील ग्रामिण रूग्णालयात वैद्यकीय अधिकारी हजर राहात नसल्याने तपासणी करण्यासाठी आलेल्या रूग्णाची गैरसोय होत असल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास या भागातील गरीब जनतेला मोफत व पारदर्शक आरोग्य सेवा पुरविण्याच्यादृष्टीने करंजी येथे ग्रामिण रूग्णालय आहे परंतु तेथील रूग्णालयामध्ये वैद्यकीय अधिकारी हजर राहात नसल्यामुळे रूग्णांवर उपचार होत नाही त्यामुळे रूग्णांना खाजगी दवाखान्यामध्ये उपचार घ्यावे लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकीय अधिकारी हजर राहात नसल्याबाबत चौकशी करुन संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
करंजी या रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची ३ पदे मंजूर असून तीनही वैद्यकीय अधिकारी कर्तव्यावर हजर असतात. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत नियुक्ती करण्यात आलेले वैद्यकीय अधिकारी सुध्दा कर्तव्यावर हजर असतात.
(२) हे खरे नाही.
करंजी येथील ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुगणालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णांवर औषधेपचार करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे नेरी (ता. चिमूर, जि. चंद्रपूर ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(३६) ११३०२४ (०१-०४-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.नेरी (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र असून या आरोग्य केंद्राला सहा उपकेंद्र जोडलेले असतांना वैद्यकिय अधिकाऱ्याअभावी तेथील रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, वैद्यकिय अधिका-यांची नियुक्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

चंद्रपुर जिल्ह्यातील चिमुर तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्र नेरी कार्यन्वित असुन त्याअंतर्गत १ ॲलोपॅथीक दवाखाना व ६ उपकेंद्रे कार्यन्वित आहेत.

सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गाची २ पदे मंजुर असुन त्यापैकी १ पद भरलेले व १ पद रिक्त आहे. ॲलोपॅथीक दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी (गट-ब) चे पद दि. ३०.१०.२०१७ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्तीमुळे रिक्त झाले आहे. तसेच उपकेंद्राअंतर्गत वैद्यकीय अधिकारी यांची पदे मंजूर नाहीत.

चंद्रपूर जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी, गट-अ च्या रिक्त असलेल्या काही पदांवर वैद्यकीय अधिकारी गट-ब व बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी यांची तात्पुरती पर्यायी व्यवस्था केली आहे.

रिक्त पदांचे ठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्यात येऊन रुग्णसुविधा पुरविण्यात येते.

(२) प्रश्न उद्भावत नाही.

(३) वैद्यकीय अधिकारी संवर्गाची पदे नामनिर्देशनाने संबंधित जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली भरण्याबाबत शासन परिपत्रक दि. २६.१०.२०१६ अन्वये निर्देश दिल्याप्रमाणे चंद्रपुर जिल्ह्यात जिल्हा निवड करण्यात आली त्यापैकी विशेषज्ञ असलेल्या उमेदवारांना ग्रामीण रुग्णालयात व ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रात एकही वैद्यकीय अधिकारी, गट-अ एमबीबीएस उपलब्ध नाही अशा ठिकाणी नियुक्ती करण्यात आली आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे जिल्हाधिकारी स्तरावरुन भरण्याची प्रक्रिया राबवुन सुध्दा सदर पदे रिक्त राहत असल्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे पुनश्च राज्यस्तरावरुन जाहिरात देऊन भरण्याबाबत निर्णय झाला असुन त्यानुसार वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ७२३ रिक्त पदांची जाहिरात दि. १३.०७.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भावत नाही.

---

**माथेरान येथील (जि.रायगड) प्राथमिक आरोग्य केंद्राची झालेली दुरवस्था**

**(३७) ११४०८५ (०१-०४-२०१८). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (जि.रायगड) येथील पर्यटन नगरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपस्थित नसल्याचे दिनांक २ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

तथापि, माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेचे वैरामजी जीजीभाय रुग्णालय आहे. सदर रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी, वर्ग-२ यांची शासनाची ०२ पदे मंजुर आहेत. दि. ०२ डिसेंबर, २०१७ रोजी मानधनावर नियुक्त १ व शासनाने नेमणुक दिलेला दुसरा वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. सद्यस्थितीत डॉ.निलेश यादव यांना दिनांक २७.०१.२०१८ रोजी अस्थायी नेमणूक व डॉ. प्रशांत यादव यांना दिनांक ०२.०१.२०१८ रोजी बंधपत्रित नियुक्ती देण्यात आलेली असून सदर दोन्ही वैद्यकीय अधिकारी दवाखान्यात उपस्थित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भावत नाही.

(४) प्रश्न उद्भावत नाही.

(५) प्रश्न उद्भावत नाही.

---

**मौजे जेऊर, केम व साडे (ता. करमाळा, जि.सोलापूर) प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामधील रिक्त पदांबाबत**

**(३८) ११५३३४ (०६-०४-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जेऊर, केम व साडे (ता. करमाळा, जि.सोलापूर) प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये प्रत्येकी १ वैद्यकीय अधिकारी, १३ आरोग्य सेवक आणि ७ आरोग्य सेविकांची पदे अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदर रिक्त पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा सोलापूर, ता.करमाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र जेऊर, प्राथमिक आरोग्य केंद्र, केम, प्राथमिक आरोग्य केंद्र, साडे या तीन प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी सवंर्गाची एकुण ६ पदे मंजुर असुन ६ पदे भरलेली आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आरोग्य सेवकांची एकुण १८ पदे मंजुर असुन १० पदे भरलेली व ८ पदे रिक्त आहेत. तसेच आरोग्य सेविकांची २० पदे मंजुर असुन १६ पदे भरलेली व ४ पदे रिक्त आहेत.

(२) आरोग्य सेवक व आरोग्य सेविका संवर्गाची पदे ही आंतरजिल्हा बदलीने, नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने रिक्त झाली आहेत.

वित्त विभाग, शासन निर्णय दि. १६/०५/२०१८ अन्वये गट क व गट ड संवर्गाची रुग्णसेवेशी संबंधित १०० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

**छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय (सीपीआर) (जि.कोल्हापूर) येथील रिक्त पदासंदर्भात**

**(३९) ११७९३५ (०१-०८-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयातील (सीपीआर) (जि.कोल्हापूर) २३८ विविध पदांच्या जागा गेल्या पाच वर्षापासून रिक्त असून तेथील काही डॉक्टर खासगी प्रॅक्टिस करित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघातग्रस्त रुग्णांवर उपचार करण्यासाठी सुमारे आठ कोटी खर्च करुन ट्रॉमा केअर सेंटर उभारण्यात आलेले असतांनाही या विभागात काम करण्याकरिता वैद्यकिय अधिकारी,परिचारिका यांची ३९ स्थायी पदे व टेक्नीशियन्सची ९ कंत्राटी पदे अशा एकत्रित ४८ पदे रिक्त असून त्यांना अदयापी मंजूरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) तसेच, जिल्हयात कर्करोगाचे वाढते प्रमाण पाहता या रुग्णालयाला शासनाने नुकत्याच केमोथेरपी उपचारांच्या सुविधासाठी जाहीर केलेल्या यादीतून वगळण्यात आले असल्याचे व या रुग्णालयाच्या प्रसूतिगृहात सोयी-सुविधा नसून या विभागातील सोनोग्राफी उपकरण देखील बंद अवस्थेत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार या रुग्णालयातील खासगी प्रॅक्टिस करणा-या डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत व रिक्त पदे भरण्यासंदर्भात तसेच रुग्णालयातील गैरसोयी दूर करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

रुग्णालयाकरिता मंजूर १०८५ पदांपैकी २४० पदे रिक्त असून ती भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच काही डॉक्टर खाजगी वैद्यकीय व्यवसाय करित असल्याची बाब निदर्शनास आली आहे

(२) ट्रॉमा केअर सेंटरकरिता नव्याने ४८ पदे निर्मितीचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(३) व (४) नॅशनल कॅन्सर ग्रीड अंतर्गत छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूरची नोंदणी करण्यात आली आहे. कर्करोगग्रस्त रुग्णांना अत्याधुनिक उपचार उपलब्ध होण्यासाठी टाटा ट्रस्ट सोबत सामंजस्य करार करण्यात आला असून त्यांचे तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांवर उपचार करण्यात येत आहे. रुग्णालयाकरिता उपलब्ध ०४ सोनोग्राफी मशीनपैकी ०१ मशीन कार्यरत असून त्याद्वारे रुग्णांची तपासणी केली जात आहे. संस्थेकरिता नव्याने सोनोग्राफी मशीन खरेदीचा प्रस्ताव संचालनालयाकडून प्राप्त होताच त्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(५) व (६) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर येथील काही अध्यापक शासनाचा व्यवसायरोध भत्ता घेवून शासकीय कर्तव्य कालावधीत खाजगी वैद्यकीय व्यवसाय करित असल्याची बाब निदर्शनास आली असल्याने एकूण ०६ अध्यापकांची अन्यत्र बदली करण्यात आली आहे. तसेच त्यांचेविरुध्द दोषारोप बजावून शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर तसेच छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूर येथील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## वेंगुर्ला (जि.सिंधुदूर्ग) येथील ग्रामीण रुग्णालयात कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया करीत असतांना महिलेचा झालेला मृत्यू

**(४०) ११८७८५ (२३-०७-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगुर्ला (जि.सिंधुदूर्ग) येथील ग्रामीण रुग्णालयात श्रीमती निलम राऊळ या महिलेवर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया करीत असतांना डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे उक्त महिलेचा

दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या महिलेच्या पतीने व नातेवाईकांनी संबंधित डॉक्टरवर गुन्हा दाखल करुन चौकशीची मागणी वेंगुर्ले पोलीस ठाणे यांच्याकडे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय ,
(३) असल्यास, सदरच्या महिलेचे कुटूंबीय, नातेवाईक दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास पोलीस ठाणे, वेंगुर्ला येथे उपोषणाला बसले होते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या घटनेची चौकशी शासनाने केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार या प्रकरणात दोषी असणा-या डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-१२-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

श्रीमती निलम राऊळ यांची कुटुंब नियोजन स्त्री नसबंदी (टाक्याची) शस्त्रक्रिया ग्रामीण रुग्णालय वेंगुर्ला येथे दि. २६.२.२०१८ रोजी झाली तथापि त्यांचा मृत्यू त्यानंतर शासकिय मेडीकल कॉलेज पणजी गोवा येथे दि. २२.०३.२०१८ रोजी झाला आहे.
(२) होय, हे खरे आहे.

श्रीमती निलम राऊळ यांचे पती श्री. जितेंद्र सिताराम राऊळ यांनी दि. २७.०४.२०१८ रोजी वेंगुर्ला पोलीस ठाणे यांचेकडे गुन्हा दाखल करुन संबधीत डॉ. राजेश्वर उबाळे यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, जिल्हास्तरीय तज्ञ समितीने या प्रकरणाची दिनांक २६.४.२०१८ रोजी बैठक घेऊन सविस्तर चौकशी केली आहे.
(५) जिल्हास्तरीय तज्ञ समितीने केलेल्या चौकशीचा अहवाल दि.२७.०४.२०१८ रोजी पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, वेंगुर्ला यांचेकडे पाठविण्यात आला असून, पोलीस ठाणे वेंगुर्ला येथे ५०/२०१८ भा.द.वि.क्र.३०४ अ प्रमाणे डॉ. राजेश्वर उबाळे यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भावत नाही.

---

**रायगांव (ता. लोणार, जि.बुलढाणा) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४१) ११९००८ (२३-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगांव (ता. लोणार, जि.बुलढाणा) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रामधील तत्कालिन डॉ.राठोड यांनी रुग्णकल्याण निधी व मानव विकास निधीमध्ये अपहार केला असल्याने त्यांची चौकशी करुन संबधित दोषीवर कारवाई करण्यासंदर्भात जिल्हापरिषद सदस्या श्रीमती

कोकाटे यांनी जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन दिनांक २४ मार्च, २०१८ रोजी च्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२९-११-२०१८) :** (१), (२) व (३) सौ. कोकाटे, जिल्हा परिषद सदस्या, जि. बुलढाणा यांनी दि. २३.०६.२०१७ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे लेखी निवेदन दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मानव विकास कार्यक्रम सन २०१३-१४ ते सन २०१६-१७ या कालावधीत रुग्ण कल्याण समिती व मानव विकास कार्यक्रमांतर्गत चौकशी करण्यासाठी नेमलेल्या त्रिसदस्यीय चौकशी समितीने दि. १२.०२.२०१८ रोजी अहवाल दिला असून, सदर चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी स्विकारला आहे. सदर चौकशी अहवालामध्ये प्रस्तावित केल्यानुसार, डॉ. बी. आर. राठोड यांचेकडून रु.१३,८४०/- व डॉ. अमित शांतीलाल बोरा यांचेकडून रु.५०००/- इतक्या दंडात्मक रकमेची वसूली करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील लोणार सरोवरावरील तारकुंपणाची दुरवस्था झाल्याबाबत

**(४२) ११९५०७ (२३-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील लोणार सरोवरावर नुकतेच लाखो रुपये खर्च करुन तारकुंपण घातले असून या कुंपणाची अत्यंत दुरवस्था झाल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामाची गुणवत्ता नियंत्रण पथकाकडून चौकशी करण्याची मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिका-यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) पुर्वेकडील वन आणि महसूली जमिनींवर असलेली ग्रामस्थांची घरे रिकामे करण्याच्या नोटीसा जिल्हा प्रशासनाने ग्रामस्थांना दिल्याबाबत**

**(४३) ११९७३९ (०९-०८-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) पुर्वेकडील वन आणि महसूली जमिनींवर असलेली ग्रामस्थांची घरे रिकामे करण्याच्या नोटीसा जिल्हा प्रशासनाने ग्रामस्थांना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नोटीसांमुळे हजारो कुटुंबे बेघर होणार असल्याने सदर जमिनीवरील बांधकामे उध्दवस्त होऊ नयेत यासाठी या नोटीसा मागे घेण्यात याव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या शिष्टमंडळाने दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.वने मंत्री यांची भेट घेऊन केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१२-२०१८) :** (१) ठाणे वनविभागातील मांडवी वनपरिक्षेत्रांतर्गत वसई तालुक्यातील वनजमिनीवर एकूण २८.३७६ हेक्टर क्षेत्रात अतिक्रमण असून त्यामधील १०२९७ अतिक्रमणधारकांना महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम,१९६६ चे कलम ५३ व ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. हे खरे आहे.

(२) व (३) वन विभागाने बजावलेल्या नोटीसींच्या अनुषंगाने वाघराळपाडा बचाव संघर्ष समितीच्या वतीने अतिक्रमण तोडण्याची कारवाई थांबविण्याबाबत दिनांक ३१.०३.२०१८ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

तथापि, भारतीय वन अधिनियम, १९२७ व महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम,१९६६ चे कलम ५३, ५४ अन्वये अतिक्रमण धारकांवर कारवाई करणे आवश्यक असल्याने, दिनांक १९.०२.२०१८ व दिनांक १३.०४.२०१८ अतिक्रमण निष्कासनाची मोहिम आखण्यात आली होती. त्यामध्ये निवासी घरे, वाणिज्य गाळे १२ व दगडी बांधकाम पाया ५४ असे अतिक्रमण निष्कासित करून ३.३६० हेक्टर वनजमिन अतिक्रमणमुक्त करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भावत नाही.

---

**मौजे खुंटघर (ता. शहापूर, जि. ठाणे) येथील वनविभागाच्या जमिनीमध्ये बेकायदेशीर विटाभट्टी कारखाना सुरु असल्याबाबत**

**(४४) १२१२४६ (३०-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खुंटघर, (ता. शहापूर, जि. ठाणे )येथील रस्त्यालगत वनविभागाची (महाराष्ट्र शासन राखीव वने) सर्व्हे नंबर १६५/अ/१, १६५/अ/२ या जमिनीमधून बेकायदेशीर गौणखनिज उत्खनन करुन विक्री केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच जमिनीवर कोणत्याही प्रकारची शासनाची परवानगी न घेता बेकायदेशीररीत्य विटभट्टी कारखानाला सुरु असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप पर्यत यावर कोणतीच कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, याप्रकरणची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार यास जबाबदार असणा-या संबधित दोषीवर कारवाई करण्यासह वनविभागाच्या जमिनीवर होत असलेले बेकायदेशीर प्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मौजे खुंटघर, ता. शहापूर, जि. ठाणे येथील गट नं. १६५/अ/१ व १६५/अ/२ मध्ये सर्व्हे क्र. १६/४, २१/३, ६४ समाविष्ट होत असून सदर क्षेत्राची महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ सुधारणा १९७८ चे कलम २२अ अंतर्गत महसूल विभागाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांमार्फत चौकशी होऊन दिनांक २५.१०.१९८० नंतर सदर क्षेत्र संबंधित खातेदारास पुन:स्थापित करण्यात आलेले असून सदर पुन:स्थापनाचे आदेशास केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. शासन पत्र दिनांक १.१.२००५ व दिनांक २२.०२.२००५ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार ७/१२ उताऱ्यावर भोगवटदार सदरी महाराष्ट्र शासन राखीव वने अशी नोंद व इतर हक्कांमध्ये संबंधित खातेदार अशी नोंद घेण्यात आलेली आहे.

सदर क्षेत्र संबंधित खातेदारास पुन:स्थापित करण्यात आलेले असल्याने सदर क्षेत्राचा भौतिक ताबा संबंधित खातेदार यांच्याकडेच आहे.

(२), (३), (४) व (५) वनक्षेत्रपाल, धसई व वन कर्मचारी यांनी दिनांक ४.८.२०१८ रोजी प्रश्नामध्ये नमुद क्षेत्राची स्थळ पाहणी केली असता सदर क्षेत्रावर श्री. राजेश लक्ष्मण अधिकारी यांनी त्यांच्या जून्या घराची दुरुस्ती करण्यासाठी माहे जानेवारी, २०१६ मध्ये विटभट्टी तयार केली होती.

सदर जमिनीचे मालक श्री.रामचंद्र नारायण डुकरे व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी मज्जाव केल्यानंतर मार्च, २०१६ मध्ये श्री. राजेश लक्ष्मण अधिकारी यांनी विटभट्टी काढून घेतली असून सदर ठिकाणी सद्यस्थितीत विटभट्टी आढळून येत नाही.

(६) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

## संगमेश्वर तालुक्यातील गावांमध्ये मंजूर झालेले बंधारे नविन निकषामुळे रदद करण्यात आल्याबाबत

**(४५) १२१४७० (२३-०७-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर तालुक्यातील १६ गावांमध्ये एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमातंर्गत पाच वर्षापूर्वी मंजूर झालेले बंधारे नविन निकषामुळे रदद करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सदर बंधा-याकरिता मंजूर झालेला १५ कोटी रुपयांचा निधी खर्च होणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषि विभागाच्या गैरकारभार परिणाम तालुक्यातील १६ गावांमध्ये बांधण्यात येणा-या बंधा-यांवर होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संगमेश्वर तालुक्यातील १६ गावांमध्ये बंधारे बाधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (०६-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) संगमेश्वर तालुक्यातील १६ गावांमध्ये एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमातंर्गत बॅच क्र. २ मध्ये एकूण ३०९ सिमेंट नालाबांधाची कामे प्रस्तावित करण्यात आली होती. त्यापैकी १४३ कामे पुर्ण झाली असून त्यावर ११६६.४१ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे. उर्वरीत कामे निविदा प्रक्रियेस प्रतिसाद न मिळणे, पाणलोट समितीमार्फत वेळेवर कार्यारंभ आदेश न देणे व कार्यारंभ आदेश देऊनही ठेकेदाराने कामे सुरु न करणे इत्यादीमुळे कामे सुरु करता आलेली नाहीत.

बॅच क्र.३ मध्ये २०३ सिमेंट नाला बांधाची कामे प्रस्तावित होती, पैकी ५१ कामे पूर्ण झाली आहेत. जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.मापदंड २०१७/(४५२/२०१७)/लपा-२ दि. १३ जुलै, २०१८ नुसार सुधारीत मापदंड ग्राहय धरुन त्या निकषामध्ये बसणारी कामे करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

## राज्यात मुलींच्या जन्म प्रमाणात घट होत असल्याबाबत

**(४६) १२२४५९ (२३-०७-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नीती आयोगाने जाहीर केलेल्या अहवालानुसार देशातील प्रमुख २१ राज्यापैकी १७ राज्यामध्ये मुलींच्या जन्मदरामध्ये घट झाली असून यामध्ये महाराष्ट्र पाचव्या स्थानावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दर हजारी ९०४ इतकी मुलींची संख्या असल्याची माहिती या अहवालानुसार समोर आल्याचे माहे मार्च-२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील घटती मुलींची संख्या ही चिंताजन बाब असून स्त्री-भ्रुणहत्या रोखण्यासाठी प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील ४१६ संशयित सोनोग्राफी केंद्रावर नजर ठेवली जात असल्याची माहिती मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी माहे मार्च-२०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील संशयित सोनोग्राफी केंद्राची तपासणी करुन दोषी असणा-या सोनोग्राफी केंद्रावर कोणती कारवाई केली तसेच राज्यात स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनामार्फत कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

नीतीआयोगाकडून माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये प्रकाशित अहवालानुसार १००० मुलांच्या जन्माच्या मागे मुलींच्या जन्माचे प्रमाण सन २०१२-२०१४ या कालावधीमध्ये ८९६ आणि सन २०१३-२०१५ या कालावधीमध्ये ८७८ एवढे आहे. नागरी नोंदणी पध्दतीच्या सन २०१६ च्या अहवालानुसार जन्माच्या वेळी १००० मुलांच्या मागे मुलींच्या जन्माचे प्रमाण ९०४ आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) राज्यात स्त्री भ्रृणहत्या रोखण्यासाठी व या संदर्भातील कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी सामुचित प्राधिकारी यांचेमार्फत सोनोग्राफी केंद्राची नियमितपणे त्रैमासिक (quarterly) तपासणी करण्यात येते. या कायदयाचे उल्लंघन करणाऱ्या दोषी सोनोग्राफी केंद्रावर कायदेशीर कारवाई करण्यात येते.

एकूण २०७ वैद्यकीय व्यवसायिकांची नावे महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला कळविली आहेत. त्यानुसार ७२ डॉक्टरांची सनद निलंबित करण्यात आलेली आहे. ५८ डॉक्टरांना ताकीद देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भ्‍ावत नाही.

---

**वाशीम जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा व बांधकाम विभागातील कामांची चौकशी करण्याबाबत**

**(४७) १२४१९५ (२४-०७-२०१८). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशीम जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा व बांधकाम विभागाची गत चार वर्षातील जवळपास ६०० कामांची चौकशी दीड महिन्यांपासून सुरू असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामांच्या चौकशीस विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, तात्काळ चौकशी पूर्ण करून दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१०-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

वाशिम जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन व बांधकाम विभागातील कामांच्या चौकशीचे आदेश जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक २७/९/२०१७ चे आधारे देण्यात आले आहेत.

(२) बांधकाम विभागातील वाशिम, मालेगाव व रिसोड तालुक्यातील कामांची चौकशी श्री. एम.सी.उके, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग (तत्कालीन), यांना दिनांक ०१/११/२०१७ रोजी सोपविण्यात आली.

तथापि, श्री. एम.सी.उके यांना पदोन्नती मिळाल्याने लघुसिंचन विभागाचा अतिरिक्त प्रभार कार्यकारी अभियंता बांधकाम यांचेकडे सोपविला आहे. त्यामुळे मुळातच बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता असल्यामुळे तसेच लघुसिंचन विभाग व बांधकाम विभागातील उपअभियंता यांचे सहकार्याने सदर चौकशी पूर्ण करण्याचा प्रयत्न, उपअभियंता ची बहुतांश पदे रिक्त असल्यामुळे विभागातील कार्यरत शा.अ. यांचेकडे प्रभार सोपविण्यात आला आहे. त्यामुळे चौकशीतील पारदर्शकता तसेच त्यांचेकडील शा.अ. तसेच उपअभियंता पदाचा प्रभार सांभाळून करावयाच्या चौकशीकरिता वेळेची उपलब्धता व चौकशीस प्रस्तावीत मोठ्या व व्यापक कामांची संख्या इत्यादीचे अनुषंगाने सदर चौकशीस विलंब झाला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

---

### वाडा (जि.पालघर) येथिल उपजिल्हा रुग्णालयात अधिक्षक पद रिक्त असल्याबाबत

**(४८) १२४३१४ (२८-०७-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा व विक्रमगड (जि.पालघर) व शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील अनेक रुग्णांना रुग्णसेवा देणाऱ्या वाडा येथील उपजिल्हा रुग्णालयात अधिक्षक पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रिक्त पद किती कालावधीत भरण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०४-१२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

तथापि, पालघर जिल्हयातील वाडा हे उपजिल्हा रुग्णालय नसून ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय आहे. वाडा ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांचेकडे सोपविण्यात आला आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड ५४०० ) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची तीन पदे मंजूर असून तीनही पदे भरलेली आहेत. तसेच आयपिएचएस अंतर्गत सर्जे-१, स्त्रीरोतज्ञ-१, बधिरीकरणतज्ञ-१ व बालरोगतज्ञ-१ तसेच

आरबीएसके अंतर्गत वैद्यकीय अधिकारी-६, ए.एन.एम.-३, औषधनिर्माण अधिकारी-३ व आयुषअंतर्गत वैद्यकीय अधिकारी-३, सिकलसेल तंत्रज्ञ-१, स्टाफनर्स-२, रक्त संकलन तंत्रज्ञ-१ व वाहन चालक-१ अशी एकूण २७ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आली आहेत. त्यामार्फत रुग्णाना रुग्ण सेवा पुरविण्यात येते.

(२) व (३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड ६६००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

---

**चांदोली (जि.सांगली) येथील अभयारण्यात वन्यप्राण्यांच्या संख्येत होत असलेली घट.**

**(४९) १२५१४४ (३०-०७-२०१८). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदोली (जि.सांगली) येथील अभयारण्यात ८-१० वर्षापूर्वी करण्यात आलेल्या प्राणी गणनेमध्ये २१ वाघ व २७ बिबटे असल्याचे निदर्शनास आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ३ वर्षापासून सदरहू अभयारण्य वाघांचे अस्तित्व नसल्याचे आढळत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अभयारण्यात असलेला अपुरा कर्मचारी वर्ग, प्राण्यांच्या आश्रय स्थळे व पाणवठ्यांची कमतरता इ. मुळे वन्यप्राणी पाणी शोधात अभयारण्याबाहेर पडत असल्याने तेथील प्राण्यांची संख्या घटली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अभयारण्यात कर्मचारी वर्ग भरण्याबाबत व वन्यप्राण्यासाठी पाणवठा निर्माण करणे यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) चांदोली अभयारण्यात १५ नियतक्षेत्र असून त्याच्या संरक्षण व संवर्धनासाठी १ वनक्षेत्रपाल, १ वनपाल, १५ वनरक्षक, ०३ कायम वनमजूर व ३४ रोजंदारी वनमजूर असा पूरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे.

सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्रातातील वन्यप्राणी पीण्याचे पाणी व अन्नाच्या शोधात वनक्षेत्राबाहेर पडू नये म्हणून सन २०१८-१९ मध्ये ५० पाणवठ्यांची दुरुस्ती व ४ नवीन पाणवठ्यांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच वनपरिक्षेत्रात कुरण विकासाची कामे केली जातात.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत बंधाऱ्याच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(५०) १२६३६१ (३१-०७-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री. महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत करण्यात आलेल्या सर्व बंधाऱ्याच्या कामांमध्ये अंदाजपत्रकातील मोजमाप व प्रत्यक्षात मोजमापात तफावत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही ठिकाणी कामाचे मोजमाप घेतल्याची तारीख आगोदर व कार्यारंभ आदेशाची तारीख नंतर दर्शविली असून सिमेंटच्या बंधाऱ्यामध्ये निकृष्ट दर्जाचे कॉक्रीट वापरल्यामुळे बंधाऱ्यामधून पाण्याची गळती होत आहे तसेच काही ठिकाणी बंधाऱ्याची संख्या जास्त दाखवण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणलोट प्रकल्पातील कामांमध्ये कृषी विभागाच्या अधिकाऱ्यानी गैरव्यवहार केल्यामुळे ही कामे ज्या क्षेत्रात करण्यात आली त्याठिकाणच्या विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली नाही व जमीन देखील ओलिताखाली आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सावंतवाडी तालुक्यातील प्रत्येक बंधाऱ्याचे स्वतंत्र यंत्रणेमार्फत तपासणी करून गैरव्यवहार करणाऱ्या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी अशा आशयाची तक्रार स्थानिक प्रशासनास दिल्या आहेत, .हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने सावंतवाडी तालुक्यातील प्रत्येक बंधाऱ्याचे स्वतंत्र यंत्रणेमार्फत तपासणी करण्यासह संबंधित दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-११-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) होय.

(५) सदर तक्रारीच्या अनुषंगाने अतिरीक्त प्रकल्प व्यवस्थापक व उप प्रकल्प व्यवस्थापक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सातारा कार्यालय यांचेमार्फत तक्रारीच्या अनुषंगाने एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत करण्यात आलेल्या संबंधित बंधाऱ्याच्या कामांची तपासणी करण्यात आलेली आहे. सिमेंट नालाबांध कामातील त्रुटीबाबत संबंधितांचा खुलासा मागविण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.